# मंगलवार

समाधान सामूजनांचेनि योगें। परी मागुतें दुख होते वियोगे। धडीन घड़ी शीण अत्यन्त वाटे। उदासीन हा काळ कोठे न कंटे ।।1।। घरें सुंदरें सौख्य नानापरीचें। परी कोण जाणेल तें अंतरीचें। मनीं आठवितांचि तो कंठ दाटे। उदासीन. ।।2।। बळें लाबिता चित्त कोठे जडेना। समाधान तें कांही केल्या पडेना। नये धीर डोळां सदा नीर लोटे। उदासीन . ।।3।। अवस्था मनीं लागली काय सांगों। गुणीं गुंतला हेत कोणासि मागों। बहूसाल भेटावया प्राण फूटे। उदासीन. ।।4।। कृपाळु पणें भेट रे रामराया। वियोंगे तुझ्या सर्व व्याकूळ काया।

जनांमाजिं लौकीक हाही न सूटे। उदासीन. ।।5।। अहा रे विधी त्वां असें काय केलें। पराधीनता पाप माझें उदेलें। बहूतांमधे चूकतां तूक तूटे। उदासीन. ।।6।। समर्था मनीं सांडि माझी नसावी। सदा सर्वदा भक्तचिंता असावी। घडेना तुझा योग हा प्राप्त खोटें। उदासीन. ।।7।। अखंडीत हे सांग सेवा घडावी। न होतां तुझी भेटि काया पडावी। दिसंदीस आयुष्य हें व्यर्थ लोटे। उदासीन. ।।8।। भजों काय सर्वापरी हीन देवा। करूं काय रे सर्व माझाचि ठेवा। म्हणों कायमी कर्मरेखा न लोटे। उदासीन. ।।9।। म्हणे दास मी वाट पाहे दयाळा। रघूनायका भक्त पाळा भुपाळा। पहावें तुला हे जिवीं आर्त मोठे। उदासीन. ।।10।।